१४/०५/२०१८

क्रमांक :- पोमसं/३६/र.व का.(८३००)/विषयसुची/१०६/२०१७,

मुंबई, दिनांक ~~२७/०४~~/२०१८

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३६/र.व का./८३००/९७, दिनांक ०३/११/१९९३.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का./८३००/९७,दिनांक २५/०७/१९९७.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का./८३००/९७, दिनांक २५/११/१९९७.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का./८३००/९७, दिनांक १७/१२/१९९७.
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का./८३००/९७,दिनांक १२/०१/१९९८.
६) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का./८३००/२००१,दिनांक ३०/०३/२००२.

**विषय** :- पोलीस महासंचालक यांचे कार्यालयातील कार्यासनांची व संख्याबळाची पुनर्रचना.

******

## परिपत्रक :-

पोलीस महासंचालक कार्यालयामध्ये विविध कार्यासने कार्यरत असून प्रत्येक कार्यासनामध्ये विशिष्ट विषय हाताळण्यात येतात. कार्यासनातील प्रलंबित कामकाजाचा अलिकडे घेतलेल्या आढाव्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यासनांमध्ये असलेले मंजुर संख्याबळ तेथील कामाच्या प्रमाणाशी सुसंगत नाही. त्यामुळे काही कार्यासनातील कामाची विभागणी केल्यास अथवा तेथील मनुष्यबळाची पुनर्रचना केल्यास कार्यालयीन कामकाज पार पाडणे अधिक सुकर होईल का, याचा आढावा घेवून अहवाल सादर करण्याकरिता या कार्यालयाचे ज्ञापन क्र.पोमसं/३६/र.व का.(८३००)/ विषयसूची/१०६/२०१७, दिनांक २७/०६/२०१७ अन्वये वरिष्ठ उपसहाय्यक (आस्थापना) यांचे अध्यक्षतेखाली सर्व उपसहाय्यक यांची समिती गठीत करण्यात आली होती.

२. त्यानुसार सदर समितीने त्यांचे पत्र क्र.पोमसं/३६/र.व का.(८३००)/ विषयसूची/१०६/२०१७, दिनांक ३१/०१/२०१८ अन्वये अहवाल सादर केला असून त्यामध्ये कामाची विभागणी व कार्यासनाच्या पुनुर्रचनेस अनुसरुन काही शिफारशी सादर केल्या आहेत. सदरच्या शिफारशीं विचारात घेऊन तसेच कार्यासनातील कामकाजाचा व मंजूर संख्याबळाचा आढावा घेवून पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासनांची, कार्यासनातील कामाची व मनुष्यबळाची पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.:-

अ) कार्यासन क्र.१९ ची विभागणी करुन का.क्र.१९ व १९-अ अशी दोन स्वतंत्र कार्यासने निर्माण करण्यात येत असून तेथील विषय खालीलप्रमाणे राहतील :-

| अ.क्र. | कार्यासन क्रमांक १९ | अ.क्र. | कार्यासन क्रमांक १९-अ |
|---|---|---|---|
| १ | पोलीस महासंचालक कार्यालयासाठी लागणारी सर्व प्रकारची साधनसामुग्री खरेदी करणे. | १ | पोलीस महासंचालक कार्यालयाच्या इमारतीचे P.W.D.(सार्वजनीक बांधकाम विभाग) खात्याशी संबंधित व पोलीस गृहनिर्माण महामंडळाशी संबंधित Civil व Electric ची कामे. |
| २ | पोलीस महासंचालक कार्यालयातील सर्व साहित्य साधनसामग्रीची देखभाल व दुरुस्ती करणे. | २ | जुने विधान भवन सभागृहाचे आरक्षण. |
| ३ | मोटार परिवहन विभाग. | ३. | टेलिफोन पुरविणे |
| ४ | पोलीस महासंचालक कार्यालयातील स्टेशनरी खरेदी | | |

तसेच, कार्यासन क्र.१९ व १९-अ मधील मंजूर मनुष्यबळ खालीलप्रमाणे राहील:-

| | कार्यासन क्रमांक १९ | | कार्यासन क्रमांक १९-अ | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | मंजुर संख्याबळ | पदनाम | मंजुर संख्याबळ |
| १ | कार्यासन अधिकारी | १ | कार्यासन अधिकारी | १ |
| २ | प्रमुख लिपीक | १ | प्रमुख लिपीक | १ |
| ३ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | २ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | १ |
| ४ | लिपिक टंकलेखक | २ | लिपिक टंकलेखक | १ |
| | एकूण | ६ | एकूण | ४. |

ब) सध्या कार्यासन क्र. १० मध्ये राज्यातील लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवालासंबंधित कामकाज चालते. सदर कार्यासन हे सध्या विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांच्या अधिपत्त्याखाली आहे. तथापि, राज्यातील लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांची आस्थापना विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अधिपत्त्याखाली असल्याने कार्यासन क्र. १० हे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अधिपत्त्याखाली आणण्यांत येत आहे. तसेच लिपिक वर्गीय संवर्गाचे कामकाज सांभाळणाऱ्या कार्यासन क्र.८ व ८-अ मधील लिपीक वर्गीय गट-"क" व "ड" पदावरील अनुकंपा नियुक्ती, लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची मत्ता व दायित्व विवरणपत्रे तसेच तत्सम विषय का.क्र.१० कडे सोपविण्यात येत आहेत. त्यामुळे, कार्यासन क्र. १० मध्ये पुढीलप्रमाणे विषय राहतील:-

| अ.क्र | कार्यासन क्रमांक १० |
|---|---|
| १ | पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अधिपत्याखालील शहर लिपीक संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे, तसेच मुफसल व जिल्हा लिपीक सवंर्गातील कार्यालय अधीक्षक / प्रमुख लिपीक यांच्या गोपनीय अहवालाचे संकलन, जतन, संस्करण, प्रतिवेदन इत्यादी. |
| २ | पोलीस महासंचालक कार्यालयातील गट-ड कर्मचाऱ्यांचे वार्षिक शेरे- संकलन, जतन व संस्करण |
| ३ | पोलीस विभागातील सर्व घटकांमध्ये लिपिक वर्गीय गट-क / गट-ड पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती |
| ४ | पोलीस महासंचालक कार्यालयातील लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी तसेच पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील राजपत्रित अधिकारी यांच्या मत्ता व दायित्व विवरणपत्रांचे संकलन, जतन इत्यादी. |

क) कार्यासन क्र.३-अ व ५-अ एकत्र करुन कार्यासन क्र.३-अ हे एकच कार्यासन निर्माण करण्यात येत आहे. कार्यासन क्र.३-अ मध्ये पुढील प्रमाणे विषय हाताळले जातील:-

| अ.क्र | कार्यासन क्रमांक ३-अ |
|---|---|
| १ | **सशस्त्र / राखीव / मोटार परिवहन / बिनतारी संदेश (अभियांत्रिकी व वाहतूक)** / श्वानपथक / आयुधिक पोलीस निरीक्षक (महिला/पुरुष) यांची आस्थापना |
| २ | सशस्त्र / राखीव / मोटार परिवहन / बिनतारी संदेश (अभियांत्रिकी व वाहतूक) या संवर्गातील पोलीस उप निरीक्षक (महिला/पुरुष) यांची आस्थापना / बदल्या / प्रतिनियुक्ती / पदोन्नती / सेवाज्येष्ठता / वेतन / निश्चिती / पुनर्नियुक्तीबाबत. |

कार्यासन क्रमांक ३-अ चे मंजूर संख्याबळ पुढीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर संख्याबळ |
|---|---|---|
| १ | कार्यासन अधिकारी | १ |
| २ | प्रमुख लिपीक | १ |
| ३ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | २ |
| ४ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३ |
| | एकूण | ७ |

ड) कार्यासन क्र.१५ मध्ये पोलीस विभागातील अधिकरी/ कर्मचारी यांचे विरुध्दच्या तक्रारी संबंधीची कामे हाताळण्यात येतात. सदर कार्यासनामध्ये हाताळण्यात येणारे विषय व त्याकरिता मंजुर असलेले संख्याबळ याचा विचार करता ते जास्त असल्याचे अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांच्या निदर्शनास आले असुन, त्यांनी कार्यासन क्र.१५ चे संख्याबळ कमी करुन ते कार्यासन क्र.४ व ५ मध्ये वाटप करण्याची शिफारस केली आहे. सदरच्या शिफारशीस अनुसरुन कार्यासन क्र.१५ मधील संख्याबळाची पुनर्रचना करण्यात येत असुन ते आता पुढीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | पदनाम | सध्याचे मंजुर संख्याबल | सुधारीत संख्याबळ |
|---|---|---|---|
| १ | कार्यासन अधिकारी | १ | १ |
| २ | प्रमुख लिपीक | १ | १ |
| ३ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ३ | १ |
| ४ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २ | २ |
| | एकूण | ७ | ५ |

इ) कार्यासन क्र.४, ५, ११, व १२ मधील प्रलंबित कामकाजाचा आढावा घेतला असता त्या कार्यासनांमध्ये प्रलंबित कामकाज जास्त प्रमाणात असुन, त्या तुलनेत मंजुर संख्याबळ कमी आहे. त्याकरिता त्या कार्यासनांतील संख्याबळाची पुनर्रचना करण्यात येत असून ते पुढीलप्रमाणे राहील :-

**कार्यासन क्रमांक ४**

| अ.क्र. | पदनाम | सध्याचे मंजुर संख्याबळ | सुधारित मंजुर संख्याबळ |
|---|---|---|---|
| १. | कार्यासन अधिकारी | १ | १ |
| २. | प्रमुख लिपीक | १ | १ |
| ३. | वरिष्ठ श्रेणी लिपीक | २ | ३ |
| ४. | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २ | ३ |
| | एकूण | ६ | ८ |

**कार्यासन क्रमांक ५**

| अ.क्र. | पदनाम | सध्याचे मंजुर संख्याबळ | सुधारित मंजुर संख्याबळ |
|---|---|---|---|
| १. | कार्यासन अधिकारी | १ | १ |
| २. | प्रमुख लिपीक | १ | १ |
| ३. | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ३ | ३ |
| ४. | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३ | ५ |
| | एकूण | ८ | १० |

कार्यासन क्रमांक ११ व १२ मध्ये पोलीस अधिकारी/ कर्मचारी व लिपीक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुध्दच्या शिस्तभंगविषयक कारवाईचे कामकाज चालते. सदर दोन्ही कार्यासनामध्ये प्रलंबित कामकाज भरपूर प्रमाणात आहे. त्यामुळे, एक विशेष मोहिम राबवून त्या कार्यासनातील प्रलंबित कामाचा निपटारा करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार कार्यासन क्र.११ यांना ६ महिन्याकरिता १ कार्यासन अधिकारी, १ प्रमुख लिपिक, २ वरिष्ठ श्रेणी लिपिक, १ कनिष्ठ श्रेणी लिपिक व कार्यासन क्र.१२ यांना ३ महिन्यांकरिता १ कार्यासन अधिकारी, १ वरिष्ठ श्रेणी लिपिक व २ कनिष्ठ श्रेणी लिपिक असे तात्पुरते अतिरिक्त संख्याबळ उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारे अतिरिक्त संख्याबळ उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर कार्यासन क्र.११ व १२ मधील संख्याबळ पुढीलप्रमाणे राहील:-

**कार्यासन क्रमांक ११**

| अ.क्र. | पदनाम | सध्याचे मंजुर संख्याबळ | तात्पुरते उपलब्ध केलेले अतिरिक्त संख्याबळ **(६ महिन्याकरिता)** | एकूण संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यासन अधिकारी | १ | १ | २ |
| २ | प्रमुख लिपिक | १ | १ | २ |
| ३ | वरिष्ठ श्रेणी लिपिक | २ | २ | ४ |
| ४ | कनिष्ठ श्रेणी लिपिक | ३ | १ | ४ |
| | एकूण | ७ | ५ | १२ |